## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र. १८५/२०२१/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. मुकुंद राधाकिसन काकडे,<br>रा. गोदरेज गार्डन, टॉवर नं.५, फ्लॅट नं.१४१,<br>गोदरेज हॉस्पिटल जवळ, विक्रोळी पूर्व, मुंबई. | अव्वल कारकून (महसूल),<br>तहसिल कार्यालय, सिन्नर, ता. सिन्नर,<br>जि.नाशिक. |

**सुनावणी दिनांक २९/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २९/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की,आयोगाच्या आदेशानुसार मला माहिती मिळालेली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ३९१५/२०१७/नाशिक वरील निर्णय दिनांक १०/०६/२०१९ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन महसूल, तहसिल कार्यालय, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांच्या दिनांक १६/०५/२०१७ रोजीच्या माहिती अर्जानुसार कार्यालयात उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

४) आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अवलोकनाचे कळविले, तक्रारदार यांनी मागणी केलेल्या माहितीची नस्ती आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि. २५/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन तहसिल कार्यालय सिन्नर यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ३९१५/२०१७/नाशिक संदर्भात दिनांक १०/०६/२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ३९१५/२०१७/नाशिक संदर्भात दिनांक १०/०६/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन तहसिल कार्यालय सिन्नर बी.डी. लिलके यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या

प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक १८५/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत – माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

नायब तहसिलदार तहसिल कार्यालय, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक.

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र ओ-२४२८ 11 SEP 2024